मच्छिमार सहकारी संस्थांच्या सभासदांच्या
यांत्रिकी नौकांना लागणाऱ्या हायस्पीड डिझेल
तेलावरील विक्रीकराची प्रतिपूर्ती करणेबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**कृषि,पशुसंवर्धन,दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग,**
**शासन निर्णय क्रमांक-मत्स्यवि-१००५/प्र.क्र.१७४/पदुम-१४**
**मंत्रालय विस्तार,मुंबई-४०००३२.**
**दिनांक:-३ सप्टेंबर,२००५.**

**वाचाः-**

१) शासन अधिसूचना,वित्त विभाग,क्र.एमएसटी-१२९५/सीआर-१०५/टॅक्सेशन-३,दिनांक २२.११.१९९६.
२) कृषि व पदुम विभाग,क्रमांक-मत्स्यवि-४३२५/(१३७)/पदुम-१४, दि.१४ जानेवारी,१९९७ चे अर्धशासकीय पत्र.
३) महाराष्ट्र मुल्यवर्धित कर अधिनियम,२००२-महाराष्ट्र सुधारणा विधेयक क्र.१ २००५,दि ९ मार्च,२००५.
४) शासन निर्णय,कृषि व पदुम विभाग,क्रमांक-मत्स्यवि-१००५/प्र.क्र.१२५/पदुम-१४,दिनांक १५ एप्रिल,२००५ व शुध्दीपत्रक समक्रमांक दिनांक २६ एप्रिल,२००५.
५) शासन निर्णय,कृषि व पदुम विभाग,क्रमांक-मत्स्यवि-१००५/प्र.क्र.१२५/पदुम-१४,दि.२४ मे,२००५.
६) आयुक्त,मत्स्यव्यवसाय यांची क्रमांक-मत्स्य(सा)/०५२५०२/९०/२००५, दि.२८ एप्रिल २००५,दि.९ मे २००५ ची पत्रे.

**प्रस्तावनाः-**

मच्छिमार सहकारी संस्थांच्या सभासदांच्या यांत्रिकी नौकांना (१-६ सिलेंडर) लागणाऱ्या हायस्पीड डिझेलवर विक्रीकरात सवलत देण्याची योजना राज्यात १९७५ पासून राबविण्यात आली आहे. उपरोक्त संदर्भाधीन क्र.१ येथील वित्त विभागाच्या शासकीय अधिसूचना दि.२२.११.१९९६ अन्वये महाराष्ट्रातील सहकारी संस्थांना त्यांच्या यांत्रिक नौकेसाठी (१-६ सिलेंडर) लागणाऱ्या हायस्पीड १०० टक्के विक्रीकर सवलतीची योजना वित्त विभागामार्फत

राबविण्यात येत होती. त्यानुसार बोटींच्या इंजिनाच्या क्षमतेप्रमाणे त्या बोटीसाठी लागणारे डिझेल निश्चित करुन मच्छिमार सहकारी संस्थेसाठी डिझेल कोटा निर्धारित करण्याची पध्दत सुरु करण्यात आली. राज्यातील मच्छिमार सहकारी संसथांना त्यांच्या सभासदांना यांत्रिक नौकांसाठी उपरोक्त संदर्भाधिन २ येथील अर्धशासकीय पत्रान्वये ठरविण्यात आलेल्या निकषाप्रमाणे आयुक्त मत्स्यव्यवसाय यांचेमार्फत डिझेल कोटा निर्धारित करण्यात आला आहे.

शासनाने सन २००५-०६ या चालू आर्थिक वर्षी दिनांक ९ जून,२००५ पर्यंत पूर्वीची योजना तात्पुरती सोय म्हणून राबविली आहे. त्याकरिता आयुक्त मत्स्यव्यवसाय यांना उपरोक्त संदर्भाधिन क्रमांक-४ व ५ येथील शासन निर्णयान्वये आकस्मिकता निधीतून रु.१३.०० कोटी मंजूर करण्यात आली आहे. महाराष्ट्र राज्यात दिनांक १ एप्रिल,२००५ पासून मूल्यवर्धित कर प्रणाली अस्तित्वात आल्यामुळे मुल्यवर्धित कर अधिनियमातील तरतुदीनुसार याप्रकरणी धोरणात्मक निर्णय घेण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.आता शासन खालीलप्रमाणे निर्णय घेत आहेः-

**<u>शासन निर्णय</u>ः-**

राज्यातील मच्छिमार सहकारी संस्थांच्या यांत्रिक (१ ते ६ सिलेंडर) लागणाऱ्या हायस्पीड डिझेलवर १०० टक्के विक्रीकरात सवलत देण्याची योजना मूल्यवर्धीत कर प्रणाली() लागू झाल्यानंतर देखील पुढे चालू ठेवण्यात येत आहे.

२. उपरोक्त संदर्भाधीन क्र.२ येथील अर्धशासकीय पत्रान्वये ठरविण्यात आलेल्या निकषाप्रमाणे आयुक्त मत्स्यव्यवसाय यांच्यामार्फत डिझेल कोटा ठरविण्यात येईल. त्यानुसार आता मच्छिमार सहकारी संस्थांनी प्रथम विक्रीकरासहित प्रचलित दराने डिझेल खरेदी करावे व १०० टक्के डिझेलवरील विक्रीकराची बिले मान्यतेसाठी आयुक्त,मत्स्यव्यवसाय यांचेकडे सादर करावी व त्यानंतर आयुक्त,मत्स्यव्यवसाय १०० टक्के विक्रीकराची प्रतिपूर्ती रुपाने पात्र मच्छिमार सहकारी संस्थांना रक्कम परत करतील.

३. सदर योजना योजनेत्तर योजना म्हणून राबविण्यात येईल व त्यासाठी आयुक्त,मत्स्यव्यवसाय हे या योजनेचे नियंत्रण अधिकारी राहतील. आयुक्त,मत्स्यव्यवसाय यांच्या कार्यालयातील लेखा अधिकारी हे आहरण व संवितरण अधिकारी राहतील.

अ) सदर योजना योजनेत्तर योजना म्हणून राबविण्यात येईल व त्यासाठी आयुक्त,मत्स्यव्यवसाय हे या योजनेचे नियंत्रण अधिकारी राहतील. आयुक्त,मत्स्यव्यवसाय यांच्या कार्यालयातील लेखा अधिकारी हे आहरण व संवितरण अधिकारी राहतील.

ब) आयुक्त,मत्स्यव्यवसाय व लेखा अधिकारी, आयुक्त,मत्स्यव्यवसाय कार्यालय यांचे नावे संयुक्त पीएलअे खाते उघडण्यास परवानगी देण्यात येत आहे. तसेच

आयुक्त,मत्स्यव्यवसाय यांना या योजनेसाठी लागणारी रक्कम लेखा व कोषागारातून काढण्याची व त्यांच्या बँकेतील स्वीय प्रपंजी खात्यात जमा करण्याची अनुमती देण्यात येत आहे.

क) सदर योजनेच्या अंमलबजावणीसाठी जिल्हा स्तरावर संबंधित सहाय्यक मत्स्यव्यवसाय संचालक हे अंमलबजावणी अधिकारी आणि प्रादेशिक मत्स्यव्यवसाय उपसंचालक,मुंबई हे पर्यवेक्षकीय अधिकारी असतील.

ड) शासनाच्या पूर्व मान्यतेने संबंधित डिझेल कंपनीला आयुक्त,मत्स्यव्यवसाय डिझेल वाटपाबाबत प्राधिकृत करतील.

४. राज्यातील मच्छिमार सहकारी संस्थेच्या सभासद मच्छिमारांच्या यांत्रिकी नौकांना (१ ते ६ सिलेंडर) लागणा-या हायस्पीड डिझेलवरील विक्रीकराची प्रतिपूर्ती करण्यासाठी दि २४ ऑगस्ट, २००५ पासून डिसेलची देयके विक्रीकर परताव्यासाठी अनुज्ञेय ठरविण्यांत आली आहेत.आयुक्त, मत्स्यव्यवसाय यांनी त्यानुसार कार्यवाही करावी.

५. आयुक्त मत्स्यव्यवसाय मुंबई यांनी या योजनेत कोणत्याही प्रकारे, कोणत्याही पातळीवर गैरव्यवहार होणार नाहीत व यापूर्वी डिझेल कोटा वाटप पध्दतीतील गैरव्यवहार टाळण्यासाठी जी मार्गदर्शक तत्वे/ सूचना विहित केल्या आहे त्याची काटेकोरपणे अंमलबजावणी होईल याबाबत दक्षता घ्यावी.

६. यासाठी दि.२४ ऑगस्ट,२००५ ते दि.३० सप्टेंबर,२००५ पर्यंत होणारा खर्च मागणी क्रमांक-डी-६,२४०५-मत्स्यव्यवसाय,१०३-सागरी मत्स्यव्यवसाय (०१) (०३) डिझेल तेलावरील विक्रीकराच्या प्रतिपूर्तीसाठी अर्थसहाय्य-४३-अर्थसहाय्य (२४०५ १२७-८) योजनेत्तर/दत्तमत या लेखाशिर्षाखाली नोंदवावा आणि हा खर्च शासन ज्ञापन,वित्त विभाग क्रमांक-आकनि-११०५/३१/अर्थसंकल्प-१४,दि.३ सप्टेंबर,२००५ अन्वये आकस्मिकता निधीतून मंजूर करण्यात आलेल्या रु.२०,००,००,०००/- (अक्षरी रुपये वीस कोटी फक्त) इतक्या अग्रिमातून भागविण्यात यावा. देयके सादर करताना, देयकावर " आकस्मिकता निधीतून शासन ज्ञापन वित्त विभाग, क्रमांक-आकनि ११०५/३१/अर्थसंकल्प-१४, दिनांक ३ सप्टेंबर,२००५ अन्वेय (संगणक सांकेतांक ८०००-०३१-९) मंजूर केलेले " अशा स्पष्ट सूचना लाल शाईने अधोरेखित कराव्यात. त्याचप्रमाणे शासन परिपत्रक वित्त विभाग क्रमांक-सीएनएफ-१०८३/१४०/ अर्थसंकल्प-३, दिनांक २६/४/१९८३ व शासन परिपत्रक, वित्त विभाग,क्रमांक-सीएनएफ-१०८६/१५३/अर्थसंकल्प-३, दिनांक २८/८/१९८६ अन्वेय केलेल्या सूचनांची अमंलबजावणी काटेकोरपणे करावी.आयुक्त मत्स्यव्यवसाय यांनी मंजूर अग्रिमातून प्रत्यक्ष मासिक खर्च केल्याची एकत्रित माहिती त्या महिन्याच्या १५ तारखेपर्यंत वित्त विभाग व कृषि व पदुम विभाग यांना पाठवावी.

७.    हा शासन निर्णय वित्त विभागाच्या सहमतीने व वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.२५९/०५/व्यय-१,दि.१/९/२००५ व अनौपचारीक संदर्भ क्रमांक १३२/ अर्थोपाय, दि. ३/ ९/२००५ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(जे.पी.डांगे)
प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन
कृषि,पशुसंवर्धन,दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग

प्रति,

आयुक्त,मत्स्यव्यवसाय,महाराष्ट्र राज्य,मुंबई-५१ (५ प्रती)
प्रादेशिक मत्स्यव्यवसाय उपसंचालक (सागरी जिल्हे)
संचालक,अर्थ व सांख्यिकी संचालनालय,मुंबई
सहसंचालक,लेखा व कोषागारे,संगणक कक्ष, नवीन प्रशासकीय भवन,५ वा मजला,मुंबई (२ प्रती)
लेखा अधिकारी,आयुक्त मत्स्यव्यवसाय यांचे कार्यालय,मुंबई
सहाय्यक मत्स्यव्यवसाय संचालक,मुंबई/ठाणे/अलिबाग/रत्नागिरी/सिंधुदुर्ग (२ प्रती)
महालेखापाल,महाराष्ट्र-१/२ (लेखा परिक्षा)/(लेखा व अनुज्ञेयता),मुंबई/नागपूर
अधिदान व लेखा अधिकारी,मुंबई
निवासी लेखा अधिकारी,मुंबई
जिल्हा कोषागार अधिकारी,ठाणे/रायगड(अलिबाग)/रत्नागिरी/सिंधुदुर्ग
वित्त विभाग (व्यय-१)/(अर्थसंकल्प-३)/(अर्थसंकल्प-१४/अर्थोपाय),मंत्रालय,मुंबई
कार्यासन अधिकारी,पदुम-१२,पदुम-१३,पदुम-१६,,कृषि
कक्ष अधिकारी (पदुम-१२,१३ व १६)कृषि व पदुम विभाग
निवडनस्ती